लोकमत

कोल्हापूर, मंगळवार, दि. ६ मे २०२५



# विवेकानंद महाविद्यालयाचा डालमेट फ्रान्सिस अव्वल

लोकमत न्यूज नेटवर्क



रेहान कित्तूर



नंदना कुलकर्णी



स्वरा दामुगडे



करण पाटील



गौरी मते



रितेश साळोखे



माधुरी जाधव



**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजच्या डालमेट केत फ्रान्सिस याने ९८. ३३ टक्के गुण मिळवून विज्ञान शाखेत प्रथम क्रमांक पटकाविला. वाणिज्य शाखेत रेहान डालमेट फ्रान्सिस कित्तूर हिने ९६. ३३ आणि कला शाखेत करण संजय पाटील याने ९३. ३३ टक्के गुण मिळविले.

विज्ञान शाखेत माधुरी जाधव हिने ९३.६७ टक्के गुण मिळविले तर साक्षी शर्मा आणि धृती मगदूम हिने ९३ टक्के गुण मिळविले. दोघींना विभागून तृतीय क्रमांक दिला. वाणिज्य शाखेत नंदना कुलकर्णी ९५.३३, स्वरा दामुगडे हिने ९४.८३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकाविला. कला शाखेत गौरी मते हिने ८७.५० गुण मिळवून द्वितीय आणि रितेश साळोखे याने ८७.१७ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकाविला.

भूशास्त्र विषयात १०० पैकी १०० गुण पाच विद्यार्थ्यांनी मिळविले. कॉम्प्युटर सायन्स, रसायनशास्त्र, गणित, अकौटन्सी, संस्कृत विषयातही १०० पैकी १०० गुण अनेक विद्यार्थ्यांनी मिळविले.

त्यांना प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, विज्ञान स्कॉलर बॅचप्रमुख प्रा. एस. पी. पाटील, प्रा एस. एन. साळुंखे, वाणिज्य स्कॉलर बॅच प्रमुख प्रा. एस. पी. वेदांते, कला विभागाचे एम. पी. गवळी, प्रा के. जे. गुजर, प्रा. एस. टी. शिंदे, प्रा विश्वंभर कुलकर्णी, प्रा. शिल्पा भोसले, विज्ञान विभागप्रमुख प्रा. एम. आर. नवले आदींचे मार्गदर्शन लाभले.

पुण्य नगरी

मंगळवार, ६ मे २०२५



डालमेट फ्रान्सिस



रोहन कित्तूर



करण पाटील

## विवेकानंद महाविद्यालय

यावर्षी विज्ञान शाखेत डालमेट कित फ्रान्सिस ९८.३३ टक्के गुणांसह प्रथम क्रमांक संपादन करून अव्वलस्थानी राहिला. माधुरी जाधव ९३.६७ टक्के गुणांसह दुसरी आली. साक्षी शर्मा, द्युती मगदूम हिने ९३ टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला. वाणिज्यमध्ये प्रथम

तरुण भारत
मंगळवार, ६ मे २०२५

# 'ज्योतिर्लिंग'मध्ये डिजिटल क्लासरूम

वार्ताहर
वडणगे

निगवे ता. करवीर येथील श्री ज्योतिर्लिंग विद्या मंदिर विद्यालयामध्ये इंटर ॲक्टिव्ह डिजिटल पॅनल बोर्ड क्लासरूमचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांच्या हस्ते इंटर ॲक्टिव्ह डिजिटल बोर्डचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी वेदक फाउंडेशनच्या प्रोजेक्ट मॅनेजर श्रुती राजू मगदूम, नवनीत पब्लिकेशनचे अधिकारी अभिजीत बोडेकर यांची प्रमुख उपस्थिती होती.



निगवे : येथील श्री ज्योतिर्लिंग विद्या मंदिर विद्यालयामध्ये डिजिटल क्लासरूमचे उदघाटन प्रसंगी कौस्तुभ गावडे, श्रुती मगदूम, अभिजीत बोडेकर, सरपंच दिपाली चौगुले आदिंसह मान्यवर.

बापूजींच्या तत्त्वज्ञानाचा आढावा घेऊन समाजासाठी आपण काहीतरी देणे लागतो या भावनेने विद्यालयास मदतीचा हातभार लावल्याचे सांगत जास्तीत जास्त शाळांमध्ये हा प्रोजेक्ट पोहोचवण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत. या शाळेतील विद्यार्थी अधिक गुणवान आहेत त्यापेक्षाही ते गुणवान व्हावेत अशी अपेक्षा यावेळी वेदक फाउंडेशनच्या श्रुती मगदूम यांनी व्यक्त केली. आजच्या जमान्यामध्ये डिजिटल लिटरसी फार गरजेची असल्याचे कौस्तुभ गावडे यांनी आपल्या मनोगतात सांगितले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक सातपुते पी.एस यांनी मान्यवरांचे स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास निगवेच्या सरपंच दिपाली चौगुले, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य नितीन चौगुले, अमर किडगावकर, मदन पाटील, केसरकर, डी.एड कॉलेजचे प्राचार्य पाटील उपस्थित होते. सूत्रसंचालन बांदेकर यु. वाय यांनी केले. मोरबाळे एस व्ही यांनी आभार मानले.